ISSN 2231-1629
Knowledge Resonance
● Vol-9 No. 2 ● July-December 2020

# श्रीमती इंदिरा गांधींचे जनकल्याणकारी कार्य

डॉ. संजय गोरे,
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
शरदराव पवार महाविद्यालय, गडचांदुर, जि. चंद्रपुर

## प्रस्तावना

स्वतंत्र भारताच्या राजकिय इतिहासातील एक सर्व सिध्द शक्तीशाली व्यक्तिमत्व म्हणजे भारताच्या पंतप्रधानपदी सर्वध ीकाळ असणाऱ्या श्रीमती इंदिरा गांधी होय. 25 जानेवारी 1966 ते 31 आक्टोबर 1984 पर्यंतचा कालखंड हा भारतामध्ये श्रीमती इंदिरा गांधीच्या नावाने ओळखला जातो. श्रीमती इंदिरा गांधीनी भारताच्या पंतप्रधान पदाची सत्तासुत्र हाती घेताच त्यांचे वडील पं. नेहरूंनी स्विकारलेल्या समाजवादी भागांचा वापर भारतातील सर्व जनतेच्या जीवनाला अर्थपूर्ण करण्यासाठी केला. पं. नेहरू जे साध्य करू शकले नाही त्या स्वप्नांना पुर्ण करण्यासाठी श्रीमती इंदिरा गांधीनी काटयांनी भरलेला मार्ग स्विकारला. श्रीमती इंदिरा गांधीनी नेहमीच गरीब, शोषीत, अल्पसंख्यांक आणि अधिकारहीन समुहाला आधार दिल. सत्तेमध्ये येताच त्यांना जाणवले की, योजना आयोगाद्वारे सांगीतलेल्या आर्थिक योजनांवर ज्याप्रकारे अंमल केला गेला त्यामूळे राष्ट्रिय उत्पन्नांतही वाढ झाली नाही. आणि गरीबीही कमी झाली नाही. त्या उलट विषमता अजूनही वाढली तसेच जनतेमध्ये शासकिय योजनांविषयी अविश्वासाची भावना निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर जनतेचा अधिक विश्वास संपादन करण्याकरिता तसेच दारिद्रयविरहीत समाज निर्माण करण्याकरीता श्रीमती इंदिरा गांधींनी अनेक जनकल्याण योजना क्रियान्वीत केल्यात. इंदिरा गांधी सरकारच्या अनेक योजनांच्या स्वरूप व उद्दिष्टांसंदर्भात तत्कालीन विरोध ी पक्षांनी प्रचंड विरोध सुध्दा केला. त्याबाबत इंदिरांनी सांगीतले की, एखादी योजना चांगली आहे किंवा वाईट हा वाद निरर्थक आहे. जनता योजनेच्या परिणामांचे आकलन करेल. तिच्या उद्देशांचे नाही. लोकशाही फक्त राजकीय क्षेत्रात सर्वांना मताधिकार देण्यामुळेच स्थापीत होत नाही तर आर्थिक व सामाजिक क्षेत्रात देखील लोकशाहीच्या मुलभूत समानतेच्या भावनेला कार्यान्वीत केले पाहिजे. श्रीमती इंदिरा गांधींनी लोकशाहीच्या या आधारभूत मान्यतेला मान्य करून शतकांपासून चालत आलेल्या दमन आणि अत्याचार यांच्या आर्थिक साम्राज्याला समूळपणे नष्ट करण्यासाठी "गरीबी हटवा" ची घोषणा दिली. श्रीमती इंदिरा गांधीद्वारा करण्यात आलेली जनकल्याणकारी कार्य ही त्यांच्या कतृत्वाची साक्ष आहे.

## श्रीमती इंदिरा गांधींच्या जनकल्याणकारी योजना :

श्रीमती गांधींनी देशाला आर्थिक मजबुती प्राप्त करून देण्यासोबतच त्याचा फायदा देशातील कोटयावधी जनतेला प्राप्त व्हावा याकरीता अनेक जन कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी केली. त्यापैकी काही निवडक जनकल्याणकारी योजनांची परामर्श याठिकाणी घेणार आहोत.

### 1. बॅकांचे राष्ट्रीयकरण :

बॅकांचे राष्ट्रीयकरण हा श्रीमती इंदिरा गांधींच्या कारकीर्दीतील एक नाविण्यपूर्ण ऐतिहासीक निर्णय होता. कोणत्याही देशाच्या आर्थिक आणि औद्योगीक विकासात हया देशातील बॅकांचे महत्व अनन्यसाधारण स्वरूपाचे असते. बॅका या कोणत्या मोठया व लघुउद्योगाला किंवा कृषीकरीता कर्जाद्वारे किती सहाय्य करते याचा प्रभाव हा त्या देशातील अर्थव्यवस्थेवर पडतो. परंतू भारतामध्ये बॅकावरती मोठया उद्योगपतींचे वर्चस्व होते त्यामूळे बॅकांद्वारे कृषी विकासाची सातत्याने उपेक्षा केली जात होती. या तत्कालीन परिस्थितीचे गांभीर्य ओळखून श्रीमती इंदिरा गांधीद्वारे बॅकांचे राष्ट्रियकरण करण्याचा प्रस्ताव राष्ट्रीय कांग्रेसच्या महासभेमध्ये मान्य केला. श्रीमती इंदिरा गांधींनी 19 जुलै 1969 ला भारताच्या 14 प्रमूख बॅकांच्या राष्ट्रियकरणाची घोषणा केली. बॅकांच्या राष्ट्रीयकरणामूळे भारतातील सामान्य जनतेला फार मोठे लाभ प्राप्त झाले. देशाची संपत्ती ही देशातील सामान्य जनतेला कर्ज उपलब्ध करून देण्याकरीता कामी आणता आली. लोकांना रोजगाराकरीता साधन उपलब्ध करून देणे सोपे झाले. राष्ट्रीय करणापूर्वी यांचा लाभ फक्त मुठभर उद्योगपती व मोठया व्यापाऱ्यांनाच करता येत होता.

**2. 20 सुत्री कार्यक्रम** : इंदिरा गांधींनी भारतामध्ये शोषण विरहीत व जाती विरहीत समाज बनविण्याचे ध्येय गाठण्यासाठी 01 जुलै 1975 ला 20 सुत्री कार्यक्रमाची घोषणा केली. या कार्यक्रमामुळे देशातील करोडों लोकांमध्ये आषेचा नविन किरण निर्माण झाला. या कार्यक्रमाचे ध्येय हे आर्थिक विकासा सोबतच सामाजिक उत्थानाचे ध्येय साध्य करणे हे सूध्दा होते. 20 सुत्री कार्यक्रम हा नागरिकांना चांगले जीवन जगण्याकरीता, सामान्यांचे कल्याण तथा सामाजीक विकास याकरीता सहाय्यक होता.20

सुत्री कार्यक्रम हा भारतीय जनतेला त्याचे मुळ अधिकार देणारे एक प्रकारचे अहिंसक आंदोलन होते. राष्ट्रीय संपत्तीचे न्यायपूर्ण वितरण करणे हेच या कार्यक्रमाचे मुख्य ध्येय होते.

या 20 सुत्री कार्यक्रमांमध्ये जिवनावश्यक वस्तूचे भाव कमी करणे, जमीनीचे योग्य वाटप करणे, घरासाठी जमीनी उपलब्ध ा करून देणे, बंधूआ मजदूरीची समाप्ती करणे, किमान शेतमजूरी ठरविणे, विजकेंद्र तयार करणे, तस्करांची संपत्ती जप्त करणे, पुस्तक व शालेय साधनांच्या किंमती नियंत्रीत करणे अशा विविध जन कल्याणकारी योजनांचा अंतर्भाव करण्यात आला होता.

**3. स्वरोजगार योजना :** 1980 मध्ये श्रीमती इंदिरा गांधी या पुन्हा सत्तेवर आल्यात. त्यावेळी देशात शिक्षीत बेरोजगारांची संख्या खुप वाढलेली होती. सर्व शिक्षीत बेरोजगारांना नोकरी सरकार देवू शकत नव्हते. परंतू या शिक्षीत तरूणांना रोजगार देण्याची नैतिक जबाबदारी मात्र सरकारची होती. त्याकरीता श्रीमती इंदिरा गांधींनी स्वरोजगार योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत माध्यमिक शिक्षण पुर्ण करणाऱ्या युवकांना पंचविस हजार पर्यंत चे कर्ज देण्याची व्यवस्था करण्यात आली. या योजनेअंतर्गत 25 टक्के कर्ज हे अनुदान म्हणून देण्याची व्यवस्था करण्यात आली. तसेच या कर्जाकरीता कोणत्याही जमानतीची आवश्यकता नव्हती. यो योजनेच्या साहाय्याने कित्येक बेरोजगार नवयुवकांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यास मदत प्राप्त झाली. स्वरोजगार योजनेची अंमलबजावणी ही समाजवादी धोरणाचाच एक महत्वपूर्ण भाग होती.

**4. भुमीहिनांना भुमीचे वितरण (सिलींग) :**

खरे भारतीय जीवन हे ग्रामिण भागात दिसून येते. म्हणून कोणतीही आर्थीक योजना तोपर्यंत यशस्वी होऊ शकत नाही जोपर्यंत की त्यामध्ये ग्रामिण जिवनाच्या विकासासाठी कार्यक्रम नसतील. त्यामूळे श्रीमती इंदिरा गांधींनी प्रामुख्याने ग्रामिण जिवनाच्या आर्थिक व सामाजिक विकासाद्वारे लक्ष पुरविले. त्यातूनच ग्रामिण भूमीहिनांना भूमीचे वितरण करणारी (सिलींग) योजना अमलात आणण्यात आली. श्रीमती इंदिरा गांधी सरकारने शेतजमीनीची कमाला सिमा निर्धारीत करून अतिरीक्त जमीन ही शासन जमा व त्या भूमीचे वितरण भूमीहीन गरीब जनतेला वितरीत करण्यात आली. ही योजना सिलींग म्हणून ओळखल्या जाते. श्रीमंत जमींदार व सावकारांकडे अतिरीक्त जमीन होती ती या सिलींग कायद्याद्वारे त्यांच्याकडून काढून घेण्यात आली व भुमीहिनांना उदरनिर्वाहाकरीता वितरीत करण्यात आली.

**5. बंधूआ मजदूर प्रथेची समाप्ती :** आपल्या देशात बंधुआ मजदुरांना बड्या जमीनदार किंवा मालगुजारांकडे कायमस्वरूपी बंधनाात ठेवण्याची प्रथा प्रचलित होती. बडे जमीनदार बंधुआ मजदुरांसोबत गुलामांसारखा व्यवहार करावयाचे. ज्यामूळे मजुरांच्या शारीरीक व मानसीक शोषणाचा प्रश्न निर्माण झाला होता. यावर उपाय म्हणून श्रीमती इंदिरा गांधींनी कायदा करून बंधुआ मजदूर प्रथा ही बेकायदेशिर ठरविली. या कायद्यामूळे बंधूआ/गुलाम मजुरांना बड्या जमीनदाराकडून होणाऱ्या शोषणापासून मुक्त केले. सर्व बंधुआ मजदुरी करणाऱ्या गरीबांना स्वतंत्र भाारताचे स्वतंत्र नागरीक म्हणून जगण्याचा अधिकार बहाल करण्यात आला. ज्या लोकांनी या प्रथेला बेकायदेशिर घोषीत केल्यानंतरही स्वतःकडे बंधुआ मजदूर ठेवलेत त्यांच्यावर सरकारद्वारे कठोर कार्यवाही करण्यात आली. या व्यतिरीक्त गरीबी दुर करण्याचे उपाय, घरांची व्यवस्था, ग्रामिण कर्जदारीचा शेवट, किमान शेत मजुरी कायदा, हातमाग विणकर सुधारणा, शहरी जमीनीचे सामाजीकरण, अस्पृश्यता समाप्ती अशा अनेक जनकल्याणकारी योजना श्रीमती इंदिरा गांधींच्या कारकिर्दीत राबविण्यात आल्या त्यापैकी निवडक योजनांचा परामर्श याठिकाणी घेण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

***संदर्भ ग्रंथ***

1. *शर्मा गोपीकिशन. 1987. भारत से इंदिरा और इंदिरा से भारत जयपूर : साहित्यगार प्रकाशन*
2) *शंकर अल्का 1988 इंदिरा प्रियदर्शनी नई दिल्ली चिल्डन बुक ट्रस्ट.*
3) *अलेक्झांडर पी सी अनु अशोक जैन इंदिरा : अंतिमपर्व पुणे राजहंस प्रकाशन*
4) *दौलतराव बी. ए. 1976. इंदिराके बढते कदम राजस्थान प्रकाशक जिल्हा क्रांगेस कमिटी*
5) *तिवारी विरेन्द्रकुमार 1983 इंदिरा गांधी का भारतीय राजनितीमे योगदान दिल्ली : दिप ॲण्ड दिप पब्लिकेशन*